# शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, छ. संभाजीनगर

# “वाचन संकल्प महाराष्ट्राचा”

## १ जानेवारी ते १५ जानेवारी

तरुणांच्या व्यक्तिमत्वाच्या आणि सामाजिक प्रबोधनाच्या विकासासाठी वाचन संस्कृती मदत करते. परंतु अलीकडच्या काळात तरुण वाचन संस्कृतीपासून दूर जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची वाचन संस्कृती वाढविण्याकरिता "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. यासाठी सूचनांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम राबवण्याचे निर्देश आहेत.

- सामुहिक वाचन
- वाचन कौशल्य कार्यशाळा
- वाचन संवाद
- पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | २९ डिसेंबर, २०२४ | ग्रंथालयाची स्वच्छता |
| २ | ३० व ३१ डिसेंबर, २०२४ | पुस्तक/ ग्रंथ प्रदर्शन |
| ३ | १ जानेवारी, २०२५ | वाचन कौशल्य कार्यशाळा<br>सामुदायिक वाचन |
| ४ | ३ ते ७ जानेवारी, २०२५ | वाचन संवाद कार्यक्रम |
| ५ | १६ जानेवारी, २०२५ | पुस्तक प्रदर्शन आणि कथन स्पर्धा |
| ६ | २६ जानेवारी, २०२५ | बक्षीस समारंभ |

## नियमांसाठी मुद्दे:

१. सहभागिता: सर्व विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

२. पुस्तक निवड:
- विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रातील पुस्तक निवडावे.
- वाचनासाठी कोणत्याही भाषेचे आणि कोणत्याही विषयाचे पुस्तक वाचण्याचे स्वातंत्र असेल (साहित्यापासून ते तंत्रज्ञानापर्यंत).

३. प्रबंध लेखन:
- वाचलेले पुस्तक सखोलपणे वाचून त्यावर चर्चात्मक आणि समीक्षणात्मक प्रबंध लिहावा.
- प्रबंध किमान 500 शब्दांचा असावा.

४. प्रबंध सादरीकरण:
- ठरलेल्या दिनांकास विद्यार्थ्यांनी आपल्या प्रबंधाचे 5 मिनिटे कथन करणे आवश्यक आहे.

५. सूचना फलक:
- वाचनासाठी पुस्तके उपलब्ध असलेल्या यादीची सूचना फलकावर दर्शनी भागात लावावी.

६. उत्कृष्ट प्रबंध निवड:
- परीक्षकांकडून 3 उत्कृष्ट प्रबंधांची निवड केली जाईल.
- निवडलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र/बक्षीस महाविद्यालयाकडून देण्यात येईल.

७. वार्षिक अंकामध्ये समावेश:
- स्पर्धेतील विजेत्या प्रबंधांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये केला जाईल.

महाराष्ट्र शासन
**शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**
शासकीय तंत्रनिकेतन समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ४३१००५

वेबसाईट : www.gcpharma.ac.in
दुरध्वनी क्र. +२४०-२३२११३०
Email:principal.gcopaurangabad@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.: शाऔनिमछसंन/आस्था/२०२४-२५/१८५४

दिनांक:२६/१२/२०२४

## कार्यालयीन आदेश

संदर्भ: महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग परिपत्रक क्र. सं कीर्ण -२०२४/ई -९०५२२१/समन्वय,दि: २०/१२/२०२४

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम संस्थेत दि. १जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यासाठी खालीलप्रमाणे ग्रंथालय समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ. क्रं | समिती सदस्यांची नावे | समिती पद |
|---|---|---|
| १. | डॉ. प्रशांत बी. शामकुवर (प्राचार्य) | अध्यक्ष |
| २. | डॉ. वैशाली नागुलवार | प्रभारी ग्रंथालय अधिकारी |
| ३. | डॉ.मयूरा काळे | सदस्य |
| ४. | डॉ.बाळू वि. घुले | सदस्य |
| ५. | डॉ.राजेंद्र मराठे | सदस्य |
| ६. | डॉ. श्वेता तापडिया | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी |
| ७. | सौ. अश्विनी वाघमारे (सहाय्यक ग्रंथपाल) | सहाय्यक ग्रंथपाल |

प्राचार्य
प्राचार्य
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,छ.
छत्रपती संभाजीनगर
संभाजीनगर

प्रत:

१. मा. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छ. संभाजीनगर यांना माहिती करीत सादर (मानार्थ)
२. ग्रंथालय (O/C) व परिभ्रमणार्थ
३. गार्ड फाईल